MHWS090002522026

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ हे जयराम विठोबा हांडे व पुष्पाबाई जयराम हांडे यांचे मुलं मुली आहेत. अर्जदारांची आई पुष्पाबाई जयराम हांडे यांचा मृत्यू दि.१४.०४.२०१८ रोजी तर वडील जयराम विठोबा होडे यांचा दि.२४.०४.२०२१ रोजी मौजा–आसोला खु, ता.मानोरा, जि.वाशिम येथे झाला. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयत पुष्पाबाई व जयराम यांचे कायदेशीर वारस असुन तसे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस दिनांक ११.०४.२०२६ रोजीचे दैनिक 'सायरन' या वृत्तपत्रामध्ये देण्यात आली. त्याची प्रत निशाणी क.२० वर दाखल केली आहे. जाहीर सुचनापत्र अहवालाची प्रत निशाणी क्र.६ वर दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या मागणीच्या पृष्टयर्थ पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.९ वर दाखल करुन अर्जातील इतर कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदारांनी ग्राम पंचायत, आसोला खु.,ता.मानोरा, जि.वाशिम यांनी निर्गमित केलेला मयत जयराम व पुष्पाबाई यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मुळप्रत नि.क्र.१० व ११ वर, पोलिस पाटील, आसोला खु. ता.मानोरा, जि.वाशिम यांनी निर्गमित केलेल्या मयत जयराम यांच्या वारस प्रमाणपत्राची मुळप्रत नि.१२ वर, तर मयत जयराम, पुष्पाबाई व अर्जदार यांच्या आधारकार्डाच्या प्रमाणित प्रती नि.क्र. १३ ते १९ वर दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांतर्फे अधिकचा पुरावा देणे नाही बाबतची पुरसिस निशाणी क्र.२१ वर दाखल आहे.

४. मृत्यू दाखल पाहता मयत नामे पुष्णाबाई जयराम हांडे यांचा मृत्यू दिनांक १४.०४.२०१७ रोजी तर मयत जयराम विठोबा हांडे यांचा मृत्यू दि. २४.०४.२०२१ रोजी

झाल्याचे दिसते. अर्जदारांतर्फे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व दाखल कागदपत्रावरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे शाबीत होते. त्यामुळे अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत नामे पुष्णाबाई जयराम हांडे व जयराम विठोबा हांडे यांचे पश्चात अर्जदार क्र.१ **संजय जयराम हांडे**, अर्जदार क्र.२ **सतिष जयराम हांडे**, अर्जदार क्र.३ **सुनिता पुरुषोत्तम ठाकरे**, अर्जदार क्र.४ **मंगलाबाई प्रल्हाद सडतकार** व अर्जदार क्र.५ **सुरेखा रामभाउ पाटील** हे वारस असल्याबाबतचा वारस दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे परिशिष्ट–ब प्रमाणे आवश्यक मुद्रांक दिल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ५ यांना देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.07.04 16:30:48 +0530

मानोरा
दिनांक : ०४.०७.२०२६

( ज. तु. कोरेगांवकर )
प्र. सह दिवाणी न्यायाधिश ( क. स्तर ),
मानोरा, जि.वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. R. K. Chavhan , (Grade-III) |
| Court Name | :- | I/c. Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 04/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 04/07/2026 |
| Order uploaded on | :- | 04/07/2026 |